- पुस्तक लेखन -

१६/४/०६ दै. सकाळ सप्तरंग पुरवणी.

## पुस्तक परिचय

# अभियांत्रिकीनंतरच्या पदविका




सध्याच्या वेगवान, स्पर्धात्मक जगात वावरताना 'स्पेशलायझेशन' अनिवार्य झाले आहे. तांत्रिक क्षेत्रात अधिक काम करू इच्छिणाऱ्यांसाठी प्रा. विजय नवले यांनी 'डिप्लोमानंतर पुढे काय? आणि बरंच काही...' हे माहितीपूर्ण पुस्तक लिहिले आहे. पदविका मिळवल्यावरच्या संधी, पुढील करिअर आणि विविध पर्याय त्यांनी सांगितले आहेत. अभियांत्रिकी पदविकेनंतर पदवी करू इच्छिणाऱ्यांसाठी प्रवेश प्रक्रियेची माहिती उदाहरणांसह दिली आहे. नोकरी करू इच्छिणाऱ्यांसाठी संधी कुठे व कशा आहेत, नोकरीत प्रगती कशी करावी, याची माहिती आहे. नोकरी सांभाळून शिकू इच्छिणाऱ्यांसाठी अर्ध वेळ अभ्यासक्रमांची माहिती आणि काही ठिकाणी धोक्याचे इशारेही दिले आहेत. तसेच पदविकेनंतर उपलब्ध अन्य क्षेत्रांतील नोकऱ्यांबाबत (शासकीय नोकऱ्या, संरक्षण दलातील संधी, मर्चंट नेव्ही) माहिती स्वतंत्र प्रकरणात दिली आहे. याच्या जोडीला पदविका विद्यार्थ्यांची मानसिकता, समस्या, अडचणी, इंग्रजीचे महत्त्व, ॲप्टिट्यूड टेस्टची तयारी, उच्च शिक्षणासाठी कर्ज, मुलाखतीची तयारी यांचीही माहिती आहे. अखेरच्या प्रकरणातील स्वतःचा व्यवसाय आणि उद्योजकता विकास तसेच स्वचा शोध ही प्रकरणे उल्लेखनीय आहेत.

**डिप्लोमानंतर पुढे काय? आणि बरंच काही.. : प्रा. विजय नवले, महेश नारके एम पॉवर, पाने : ११५, किंमत : ६० रुपये.**

# अभियांत्रिकीच्या शाखांची माहिती देणारे पुस्तक

अभियांत्रिकीला प्रवेश घेतेवेळी कोणत्या शाखेला प्रवेश घ्यावा, कोणत्या शाखेसाठी प्रवेश घेतल्यास चांगल्या संधी आहेत, प्रत्येक शाखेचा अभ्यासक्रम काय असतो, विविध अभ्यासक्रमांसाठीची राज्यभरातील महाविद्यालये कोणती, प्रवेश कोठे घ्यावा या विद्यार्थी आणि पालकांना दरवर्षी पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देणाचा प्रयत्न 'एम-पॉवर' पुणेप्रकाशित 'अभियांत्रिकी शाखा निवड मार्गदर्शक' या पुस्तकामध्ये केलेला आहे. अभियांत्रिकीच्या कॉम्प्युटर, आय.टी.सारख्या लोकप्रिय शाखांबरोबरच नव्याने उदयास आलेल्या बायो-मेडिकल, बायोटेकसारख्या बत्तीसहून अधिक शाखांची अद्यावत माहिती या पुस्तकरूपाने उपलब्ध झालेली आहे. प्रत्येक शाखेसाठी स्वतंत्र प्रकरण असून त्यामध्ये त्या शाखेची उपयुक्तता, उपयोजन, औद्योगिक क्षेत्रातील स्थान, शिकविले जाणारे महत्त्वाचे विषय, आवश्यक अंगभूत कौशल्ये यांची नेटकी माहिती पुस्तकात देण्यात आलेली आहे.

अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला प्रवेश घेताना विद्यार्थी आणि पालकांची मनोभूमिका काय असावी याचेही विश्लेषण पुस्तकात करण्यात आलेले आहे. हा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठीच्या टिप्स, इंग्रजी भाषेचे महत्त्व, शैक्षणिक कर्ज आदी उपयुक्त माहितीचा समावेशही येथे केलेला आहे. पदवी व पदविका अशा दोन्ही पर्यायांना समोर ठेवून राज्यातील शासकीय, अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालये आणि तंत्रनिकेतनांची अभ्यासक्रमासहीत यादी या पुस्तकात देण्यात आलेली आहे. अभियांत्रिकी शिक्षणाचे मर्म ओळखून आपल्यासाठी योग्य करिअरची निवड करण्यासाठी विद्यार्थ्यांना हे पुस्तक निश्चित मदत करील.

**अभियांत्रिकी शाखा निवड मार्गदर्शक**
**प्रा. विजय नवले, महेश नारके,**
**एम् पॉवर, पुणे**
**पाने २६०, कि.१५०**

दै. पुढारी ३० जुलै २००६
पान (५) रविवार 'बहार' पुरवणी